**(नि.क्र.३६)**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की–

माझे नाव :– इमरान खान सलीम खान,

वय :– ३१ वर्षे,

व्यवसाय :– चालक,

राहणार :– गटरमलपुरा, परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती .

––––

## सरतपासणी सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. आय. वाय. पठाण यांच्यामार्फत

१. सदरची घटना हे दिनांक १३.०९.२०१६ रोजी दुपारी ३.०० चे दरम्यान लालपुल ते खिरणी बगीचा रोडच्या शेजारी मी जात असतांना घडली. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ४ यांनी लालपुल ते खिरणी बगीचा या रोडवर माझा रस्ता अडवला. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ यांच्या हातामध्ये तलवार होती तसेच आरोपी क्र.३ व ४ यांच्या हातामध्ये पाईप होते. त्यानंतर आरोपी क्र.१ मला म्हणाला, ‘तलवार से तुम्हे काट दुंगा’ व आरोपी क्र.३ व ४ मला म्हणाले की, ‘पाईप से तेरे पैर तोड दुंगा’, असे म्हणुन सर्व आरोपींनी मला शिवीगाळ केली. त्यावेळी त्या ठिकाणहुन निसार खान व फैयाज खान हे जात होते. त्यांनी मला आरोपींच्या तावडीतुन वाचविले. त्यानंतर मी पोलीस ठाणेत जावुन प्रस्तुत गुन्ह्याचा रिपोर्ट नोंदविला. आता मला सदरचा रिपोर्ट दाखविण्यात आला. त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. ती मी ओळखतो. रिपोर्ट यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे. आज आरोपी न्यायालयात हजर नाहीत. पोलीसांनी तपासादरम्यान माझे बयाण नोंदविले हाते.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास संपला.**

**(नि.क्र.३६)**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास आरोपींचे विधीज्ञ श्रीमती वाय. बी. बोबडे मॅडम यांचे नि.क्र.३८ येथील मुदत अर्जान्वये पुढील तारखेपर्यंत तहकुब.</u>**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Sd/-
(सी. एस. देशपांडे)
प्रथमवर्ग न्योयदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, अचलपूर

ठिकाण :- अचलपूर.
दिनांक :- ०५/०६/२०२६.